पुढारी

# 'रवळनाथ'चे अनुकरण तासगाव तालुक्यात करणार

## तहसीलदार समीर माने : रवळनाथ हौसिंगतर्फे आजऱ्यात कार्यक्रम

आजरा : पुढारी वृत्तसेवा

आजऱ्यासारख्या ग्रामीण भागात स्थापन झालेल्या 'रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीने' हौसिंग फायनान्सबरोबरच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात दिलेले योगदान कौतुकास्पद आहे. आजऱ्याच्या तुलनेने मोठा असूनही तासगाव तालुका सहकार, शिक्षण व साहित्य क्षेत्रात मागे आहे. त्यामुळे तासगावमध्ये 'रवळनाथ' सारखी संस्था सुरू करून विविध उपक्रम राबविण्याचा मानस आहे. त्यासाठी 'रवळनाथ'चे संस्थापक एम. एल. चौगुले यांचे मार्गदर्शन घेणार असल्याचे प्रतिपादन आजऱ्याचे तहसीलदार समीर माने यांनी केले.



आजरा : 'रवळनाथ'तर्फे सभासदांचा सत्कार करताना तहसीलदार समीर माने, गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले.

ते आजरा येथे रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित सभासद व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष चौगुले होते. गटविकास अधिकारी दाजी दाईंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी ज्येष्ठ सभासद दिलीप भालेराव, केराप्पा कोंडुसकर, सुभाष केसरकर, केरबा कांबळे, डॉ. संदीप देशपांडे, स्वरूप तोडकर, श्रीहरी चिकुर्डे यांचा गौरव करण्यात आला. तहसीलदार माने पुढे म्हणाले, आजरा परिसरातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी 'रवळनाथ'ने स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन केंद्र सुरू करावे. यावेळी गटविकास अधिकारी दाईंगडे, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, दिलीप भालेराव यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, डॉ. शिवशंकर उपासे, नवनाथ शिंदे, प्रा. राजीव टोपले, शाखाधिकारी बसवराज चौगुले यांच्यासह सभासद, कर्मचारी उपस्थित होते. आजरा शाखाध्यक्ष डॉ. विनायक आजगेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. नूरजहाँ सोलापूरे यांनी सूत्रसंचालन केले. सुरेखा भालेराव यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Jul 29, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in